आजचा शुभ विचार
जे इतिहास विसरतात, ते इतिहास घडवू शकत नाहीत.'इतिहास कधी विसरायचा नसतो. त्यातून अनेक गोष्टी शिकायच्या असतात. ज्या चुका इतिहासात झाल्या त्या पुन्हा होऊ द्यायच्या नसतात.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर

RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com

पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!




मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-08 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Wednesday 07 May 2025 ▪ PAGES 4 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ०८ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ बुधवार, दि. ०७ मे २०२५ ▪ पाने ४ ▪ ₹ ४ रुपये

## “चार आठवड्यांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर करा” सर्वोच्च न्यायालयाचे आदेश; OBC आरक्षणाविषयी विअत्रला महत्वाचा प्रश्न

विशेष वृत्त सेवा
दैनिक स्वराज्यदूत
------------------------

गेल्या अडीच-तीन वर्षांपासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत चार आठवड्यात निर्णय घ्या, असे स्पष्ट आदेश सर्वोच्च न्यायालयाने आज महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाला दिले. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि एन. के. सिंग यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली. लाईव्ह लॉ ने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.




**ओबीसी आरक्षणाचं काय होणार?**

आयोगाच्या २०२२ च्या अहवालापूर्वी महाराष्ट्रात अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार ओबीसी समाजाला आरक्षण देऊन या निवडणुका घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसंच, येत्या चार महिन्यांत पार पडली पाहिजे. योग्य परिस्थितीत कालावधी वाढवून दिला जाऊ शकतो, असंही सर्वोच्च न्यायालयाने पुढे स्पष्ट केलं. सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालामुळे मुंबईसह राज्यसभरातील महापालिकांच्या निवडणुका लवकरच लागण्याची शक्यता आहे. गेल्या अडीच ते तीन वर्षांपासून या निवडणुका रखडल्या आहेत. महापालिकांसह अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांची सदस्य संख्या किती असावी, प्रभाग रचना कशी असावी आणि प्रभाग रचना, सदस्यांची संख्या राज्य निवडणूक आयोगाने ठरवावी की राज्य सरकारने आणि ओबीसी आरक्षणासहित निवडणुका व्हाव्यात की नाही आदी विविध विषयांवर सर्वोच्च न्यायालयात याचिका प्रलंबित होती.

**न्यायालयाने काय म्हटलंय?**

सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने असं निरिक्षण नोंदवलंय की स्थानिक संस्था अनिश्चित काळासाठी अडखळत ठेवता येणार नाहीत आणि वेळेवर निवडणुका हे तळागाळातील लोकशाहीचे सार आहे. त्यामुळे जिथं मुदत संपली आहे किंवा जिथं प्रशासन राज असलेल्या महानगरपालिका, परिषदा, नगर पंचायती आणि जिल्हा परिषदांसाठी निवडणुका घेण्यात याव्यात, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले.

## मीठाची भेसळ केलेले १० लाखाचे दूध नष्ट

राजेंद्र यादव
सांगली प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
------------------------

मीठाची भेसळ आढळल्याने १० लाखाचे ३० हजार लिटर दूध नागज (ता. कवठेमहांकाळ) येथे नष्ट करण्यात आले. अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पथकाने ही कारवाई केल्याचे सहायक आयुक्त नि.सु. मसारे यांनी दिली. श्री. मसारे यांनी सांगितले, अन्न सुरक्षा अधिकारी पवार, स्वामी, नमुना सहायक कवाळे, कसबेकर यांच्या पथकाने नागज फाटा येथे थांबून दूध वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी केली. दूधाच्या पाच टँकरची तपासणी करण्यात आली. या टँकरमधील




दुधाची इन्स्टंट स्ट्रीपच्या सहाय्याने भेसळीची प्राथमिक तपासणी करण्यात आली. कोल्हापूर जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ (गोकुळ) व वारणा डेअरी, कोल्हापूर येथे जाणार्या टँकरमधील दुधाचे ३ नमुने विश्लेषणाकरीता घेण्यात आले. यापैकी एका टँकरमधील (एम एच ०९ जी आर ५५६७) गाय दुधाची प्राथमिक तपासणी केली असता त्यामध्ये मीठाची भेसळ आढळल्याने अन्न सुरक्षा अधिकारी श्री. पवार यांनी या टँकरमधून दोन कप्प्यामधून गाय दुधाचे दोन नमुने विश्लेषणाकरीता घेऊन गाय दुधाचा १० लाख ६३ हजार ८६० रूपये किंमतीचा ३० हजार ३९६ लिटर साठा भेसळीच्या संशयावरुन ओतून नष्ट केला. टँकर घेरडी (ता. सांगोला) येथील एल. के. पी. दुध शितकरन केंद्र येथून गाय दुध घेवून हामीदवाडा (ता. कागल) येथील दत्त इंडीया या कंपनीस जात असल्याचे प्राथमिक तपासामध्ये निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी अन्न नमुन्यांचे विश्लेषण अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही घेण्यात येणार असल्याचे प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे. नागरीकांना अन्न पदार्थामधील भेसळीबाबत काही माहिती असल्यास तसेच अन्न पदार्थांबाबत काही तक्रारी असल्यास अन्न व औषध प्रशासन, सांगली कार्यालयाशी प्रत्यक्ष संपर्क करुन किंवा ई मेलवर माहिती किंवा तक्रार नोंदवावी, असे आवाहन सहाय्यक आयुक्त श्री. मसारे यांनी केले आहे.

## जळगावमध्ये सोन्याची पुन्हा लाखापुढे झेप

संदीप पाटील
जळगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
------------------------

शहरातील सराफ बाजारात सोमवारी १८५४ रुपयांची वाढ नोंदविण्यात आल्याने सोन्याचे दर जीएसटीसह प्रतितोळा ९८ हजार ६७३ रुपयांपर्यंत पोहोचले होते. मंगळवारी दिवसभरात पुन्हा १४४३ रुपयांची वाढ नोंदविण्यात आल्याने सोन्याचा दर एक लाख ११६ रुपयांपर्यंत गेला आहे. अक्षय्य तृतीयेनंतर खालावलेले सोन्याचे दर दोनच दिवसात एक लाखावर गेल्याने ग्राहकांना मोठा धक्का बसला आहे. सराफ बाजारात मंगळवारी दुपारपर्यंत १२३६ रुपयांची वाढ झाल्याने सोन्याचे दर एक लाखाच्या उंबरठ्यावर पोहोचले होते. त्यात सायंकाळी पुन्हा २०७ रुपयांची वाढ झाल्याने सोन्याचे एक लाखावर



गेले. सोन्याचे दर कमी होण्याची आशा बाळगून असलेल्या ग्राहकांसह सुवर्ण व्यावसायिकांची त्यामुळे मोठी निराशा झाली. अलीकडच्या काळात सोने आणि चांदीच्या किमतीत सतत चढ-उतार अनुभवण्यास मिळाले आहेत. त्यानुसार, मंगळवारी पुन्हा एकदा सोन्याच्या किमतीत वाढ झाली असून, बाजारात तेजीचे वातावरण निर्माण झाले आहे. दागिने खरेदी करण्याची योजना आखत असलेल्या ग्राहकांना वाढत्या किमतीचा विचारपूर्वक अंदाज घेऊन यापुढे निर्णय घ्यावा लागणार आहे. सराफ बाजारातील सोन्याचा वाढत्या दरावर गुंतवणूकदार आणि ग्राहक दोघांचेही लक्ष लागले आहे. भारतामध्ये सोन्याच्या किमतीत होणाऱ्या चढ-उतारामागे आंतरराष्ट्रीय बाजाराची स्थिती, सरकारने लादलेले आयात शुल्क आणि कर, तसेच रुपयाच्या विनिमय दरातील बदल हे महत्त्वाचे घटक आहेत. मात्र, सोने हे केवळ आर्थिक गुंतवणुकीचे साधन नसून भारतीय संस्कृतीत त्याला धार्मिक, सामाजिक आणि पारंपरिक महत्त्व आहे. लग्नसराई आणि विविध सण-उत्सवांच्या काळात सोन्याची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढते. ज्यामुळे त्याच्या किमतीतही सातत्याने वाढ होत असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

**चांदीच्या दरातही २०६० रुपये वाढ**

जळगावमध्ये शनिवारी २०६० रुपयांची घट नोंदविण्यात आल्याने चांदीचे दर जीएसटीसह प्रतिकिलो ९७ हजार ८५० रुपयांपर्यंत घसरले होते. सोमवारी दिवसभरात कोणतीही वाढ अथवा घट नोंदविण्यात न आल्याने चांदीचे दर स्थिरच राहिले. त्यामुळे ग्राहकांना काहीअंशी दिलासा मिळाला होता. मात्र, मंगळवारी दिवसभरात २०६० रुपयांची वाढ नोंदविण्यात आल्याने चांदी प्रतिकिलो ९९ हजार ९१० रुपयांपर्यंत पोहोचली.

## जम्मू-काश्मीरमधील पर्यटन व्यवसाय 90 टक्क्यांनी घसरला, फक्त दक्षिण भारतातील राज्यांकडून आता आशेचा किरण

विशेष वृत्त सेवा
दैनिक स्वराज्यदूत
--------------------

जम्मू काश्मीरच्या पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला झाल्यानंतर जम्मू काश्मीरमधील पर्यटन व्यवसाय ठप्प होत आहे. बहुतेक राज्यांमधून पर्यटकांचे आलेले बुकिंग्स रद्द झाले असून व्यावसायिकांना आता दक्षिणेकडील राज्यांकडून आशेचा किरण दिसत आहे. कारण, दक्षिणेकडील राज्यांकडून येणाऱ्या पर्यटकांनी अद्याप बुकिंग रद्द केलेले नाहीत. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.



**दक्षिणेकडील राज्यांकडून आशेचा किरण**

“जे काही नुकसान व्हायचे होते ते झाले आहे”, असं काश्मीरच्या ट्रॅव्हल एजंट्स असोसिएशनचे अध्यक्ष रौफ त्रंबू म्हणाले. “काही प्रमाणात बुकींग रद्द झाले असून नवे बुकिंग्स आलेले नाही”, असंही ते म्हणाले. ट्रम्बू म्हणाले की, या पर्यटन हंगामात पाच ते सहा हजार कोटी रुपयांचं नुकसान होण्याची शक्यता आहे, विशेषतः गुजरात, महाराष्ट्र आणि पश्चिम बंगालमधील पर्यटक मोठ्या संख्येने पर्यटन रद्द करत आहेत. तर उत्तर भारतीय राज्यांकडून फारसं पर्यटन होत नाही. पण दक्षिण भारतीयांकडून फार कमी वेळा रद्द केलं जातं. त्यांचं योगदान २०-२५ टक्के आहे आणि त्यामुळे आम्हाला आशेचा किरण मिळाला आहे”, असं ट्रम्बू म्हणाले. काश्मीरमधील पर्यटन हंगाम मार्चच्या मध्यापासून सुरू होतो आणि जूनच्या मध्यापर्यंत टिकतो. कारण, या काळात भारतातील बहुतेक भागांमध्ये उन्हाळी सुट्ट्या जाहीर केल्या जातात. जुलै आणि ऑगस्ट फार मोठ्या प्रमाणात पर्यटन होत नाही. परंतु सप्टेंबरमध्ये पर्यटकांचा ओघ पुन्हा वाढतो.

**९० टक्क्यांनी पर्यटन व्यवसाय घसरला**

“ जे घडले त्यामुळे आम्ही जाहिरातींमध्येही मंदावलो आहोत. उन्हाळा आता संपला आहे; आता आम्ही शरद ऋतू आणि हिवाळ्यासाठी नियोजन करत आहोत”, असंही त्यांनी स्पष्ट केलं. काश्मीर हाऊसबोट ओनर्स असोसिएशनचे अध्यक्ष मंजूर अहमद पख्तून म्हणाले, “सरकारकडे अचूक आकडेवारी असेल. पण रद्द झालेल्या बुकिंग्सवरून आपल्याला असं दिसून येतं की पर्यटन ९० टक्क्यांनी कमी झालं आहे. ५ एप्रिल ते ९ जूनपर्यंत, हाऊसबोट्स पूर्णपणे भरलेले असायचे, पण इथे फारसे कोणीच नव्हते. त्यातच सरकारने ४९ पर्यटन स्थळे पर्यटकांसाठी बंद केल्याने आमच्या अडचणी अधिक वाढल्या. “ आता आमच्याकडे तीन प्रमुख पर्यटन स्थळे उरली आहेत – गुलमर्ग, सोनमर्ग आणि पहलगाम. जर एखादा पर्यटक पहलगामला गेला तर तो अरु, बैसरन किंवा बेताब खोऱ्यात जाऊ शकत नाही” , असं त्रंबू म्हणाले. श्रीनगरचा रहिवासी मुजमिल अहमद वाणी, नोकरी सोडल्यानंतर दोडापथरी येथे एक रेस्टॉरंट बांधत होता. श्रीनगर शहरापासून ४५ किमी अंतरावर असलेल्या बडगाममधील दोडापाथरी रिसॉर्ट हे बंद करण्याच्या यादीतील ४९ क्षेत्रांपैकी एक आहे. “मी माझी अभियांत्रिकीची नोकरी सोडली आणि रिसॉर्टचे काम करण्यासाठी कर्ज घेतले. ते आता स्थानिकांसाठीही बंद आहे”, अशी खंत त्याने व्यक्त केली. बांदीपोरा येथील नियंत्रण रेषेवरील गुरेझ हे खोरे काश्मीरमधील पर्यटक आणि स्थानिकांसाठी बंद करण्यात आले आहे. गुरेझ इन हॉटेल अँड रेस्टॉरंट चालवणारे मेहमूद अहमद म्हणाले, “सैन्यदलाने त्रागबल येथे (गुरेझच्या मार्गावर) एक चौकी उभारली आहे आणि कोणालाही पुढे जाण्याची परवानगी नाही. सर्व बुकिंग रद्द करण्यात आली आहेत. माझ्याकडे सहा कर्मचारी होते आणि मला पाच जणांना कामावरून काढून टाकावे लागले.”

## अहिल्यानगर येथील ऐतिहासिक कॅबिनेट बैठकीत घेतले महत्त्वाचे निर्णय; मुख्यमंत्री फडणवीसांनी दिली माहिती

अहिल्यानगर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
---------------------

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली अहिल्यानगर येथे ऐतिहासिक राज्य मंत्रिपरिषद घेण्यात आली होती. या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. चौंडी येथे अहिल्यादेवी होळकरांचे स्मृतीस्थान जतन आणि संवर्धनाकरता कोट्यवधींचा निधी मंजूर करण्यात आला असून अहिल्यानगर येथे वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. कॅबिनेट बैठक संपल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत यासंदर्भातील माहिती दिली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदेही उपस्थित होते. “चौंडीला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचं स्मृतीस्थळ जतन आणि संवर्धनाकरता ६८१ कोटींचा आराखडा मान्य केला आहे. यातून विविध प्रकारची कामं होतील. अखिल भारतीय स्तरांचं एक प्रेरणास्थळ आणि तीर्थस्थळ म्हणून हे तयार झालं पाहिजे, अशा प्रकारचा प्रयत्न केला



आहे. यासोबत त्रिशताब्दीचं औचित्य साधून याच बैठकीत अष्टविनायक गणपती मंदिरांचा जिर्णोद्धार १४७ कोटी रुपये, श्री क्षेत्र तुळजा भवानी मंदिर विकास आराखडा १८६५ कोटी, श्री क्षेत्र ज्योतिबा मंदिर विकास आराखडा २५९ कोटी रुपये, त्र्यंबकेश्वर विकास आराखडा २७५ कोटी रुपये, श्री क्षेत्र महालक्ष्मी मंदिर विकास आराखडा १४४५ कोटी रुपये, श्री क्षेत्र माहुरगड विकास आराखडा ८२९ कोटी रुपये असे जवळपास ५ हजार ५०३ कोटी रुपयांच्या प्रकल्पांना मान्यता दिली आहे”, अशी माहिती देवेंद्र यांनी पत्रकार परिषदेत दिली.

**बहुभाषिक चित्रपट निर्माण करणार**

“जे कार्य देशात अहिल्यादेवींनी केलं, तेच कार्य त्यांच्या त्रिशताब्दीनिमित्ताने राज्य सरकारच्या माध्यमातून करत आहोत. पुण्यश्लोक अहिल्या देवींचं जीवन आणि कार्य याचा परिचय संपूर्ण जगाला झाला पाहिजे, या करता त्यांच्या जीवनावर बहुभाषिक कर्मशिअल चित्रपट निर्माण करण्याचा निर्णय घेतला आहे”, असंही ते म्हणाले.

**अहिल्यानगरमध्ये मेडिकल कॉलेज**

अहिल्यानगर जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करणार. या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय असेल. तसंच, अहिल्यानगरमध्ये खास मुलींकरिता आयटीआय तयार करण्याचा निर्णय करण्यात आला आहे. एक नवीन महिला सक्षमीकरणाकरता आदिशक्ती अभियान राबवण्याचं ठरवलं आहे. महिला सक्षमीकरणाकरता आदिशक्ती अभियान राबवण्याचं ठरवलं आहे. आर्थिक, सामाजिक, आरोग्यविषयक समस्यांबाबत समाजात संवेदनशीलता निर्माण करणे, जागृती करणे हा आपला प्रयत्न असेल. या क्षेत्रात काम करणाऱ्या महिला आणि संस्थांना आदिशक्ती पुरस्कार प्रदान करण्याचा निर्णय घेतला आहे.

सम्पादकीय

# कसा 'सूर्य' अंधाराच्या...

सर्व सौर ऊर्जा उत्सुकांनी गेल्या आठवड्यात स्पेन, पोर्तुगाल आणि फ्रान्सच्या काही भागांत काय झाले, याचा अभ्यास करायला हवा... एकेका विषयाचे खूळ सुरू झाले, की शहाणे म्हणवणारेही शिंगे मोडून वासरात शिरतात. सौर ऊर्जा हे एक सध्याचे असे खूळ. ऊर्जा क्षेत्रातील 'ऊ'देखील माहीत नसलेले भले भले सौर ऊर्जेने असे होईल आणि तसे होईल अशी प्रवचने करत गावगन्ना हिंडताना दिसतात. काही विशिष्ट उद्योगसमूहांस सौर ऊर्जा क्षेत्रात व्यवसाय वृद्धीचा कंड सुटणे आणि त्याच वेळी सौर ऊर्जा हा जणू सर्व ऊर्जा समस्यांवरील रामबाण इलाज असल्यासारखे सरकारने वागणे यांतील परस्पर संबंधदेखील या उत्साही कार्यकर्त्यांस दिसत नाही. सूर्य दररोज उगवतो ते केवळ आपणास वीज देण्यासाठीच, असा या मंडळींचा समज असावा. त्यात सौर ऊर्जेची सुरसुरी आलेल्यांस पर्यावरणवाद्यांची साथ. म्हणजे आंधळ्याने बहिऱ्यास पत्ता विचारण्यासारखे. या सर्व सौर ऊर्जा उत्सुकांनी गेल्या आठवड्यात स्पेन, पोर्तुगाल आणि फ्रान्सच्या काही भागांत काय झाले याचा अभ्यास करायला हवा. या तीन ठिकाणी भरदिवसा अचानक वीज गेली आणि पुरता हाहाकार माजला. रस्त्यावरचे वाहतूक सिग्नल, विमाने, मोबाइल फोन सेवा, दूरध्वनी, रेल्वे, रुग्णालये अशा सर्वच सेवा वीजपुरवठा खंडित झाल्याने बंद पडल्या. त्या देशांत 'विजेची बचत म्हणजे विजेची निर्मिती' असा दात कोरून पोट भरण्याचा सल्ला सरकार देत नाही. त्यामुळे सर्व नागरिक सढळ हस्ते वीज वापरतात. अशा परिस्थितीत वीजपुरवठा खंडित होणे हे श्वास कोंडण्याइतके प्राणघातक होते. पण अशी वेळ या समृद्ध प्रांतांवर मुळात आलीच का? सौर ऊर्जेवरील अवलंबित्व, हे त्याचे कारण. पर्यावरणस्नेह, हरित ऊर्जा अशा विषयांचे खूळ युरोपियांच्या रक्तात पार खोलवर भिनले असल्यामुळे पारंपरिक ऊर्जा स्रोत बंद करून हे देश अपारंपरिक ऊर्जा स्रोतांकडे अधिकाधिक वळू लागले. आज स्पेनच्या एकूण गरजेतील ५५ टक्के वीज ही सौर ऊर्जा आहे आणि पुढील पाच वर्षांत हे प्रमाण ६० टक्क्यांवर नेण्याचा त्या देशाचा मानस आहे. तथापि गेल्या आठवड्यात जे घडले त्यामुळे सौर ऊर्जेवर एवढे अवलंबून राहावे का, अशी चर्चा केवळ त्याच देशात नव्हे तर संपूर्ण युरोपभर सुरू झाली. ज्या दिवशी स्पेन, पोर्तुगाल, फ्रान्सचा काही भाग इत्यादी ठिकाणी वीज खंडित झाली त्या दिवशी ना काही नैसर्गिक संकट आले होते ना ढगाळ वातावरणामुळे सौर ऊर्जा निर्मिती मंदावलेली होती. चांगला प्रसन्न सूर्यप्रकाशी दिवस असूनही या परिसरास सौर ऊर्जेने त्या दिवशी दगा दिला. हे का झाले? कारण सौर ऊर्जेचा अतिरिक्त पुरवठा. सौर ऊर्जा ही अर्थातच दिवसा तयार होते आणि अंधार पडल्यानंतर वापरण्यासाठी ती साठवून ठेवायची तर वीज साठवणाऱ्या बॅटऱ्या हव्यात. शिवाय अशी अपारंपरिक ऊर्जा 'डीसी' (डायरेक्ट करंट) स्वरूपात असते आणि आपली सर्व उपकरणे ही 'एसी' (आल्टरनेट करंट) विजेवर चालतात. 'एसी' विजेत वीजवाहिन्या धन आणि ऋण भार आलटून-पालटून बदलत राहतात. या बदलास 'फ्रिक्वेंसी' म्हणतात. स्थिर वीजपुरवठ्यासाठी ती प्रतिसेकंद ५० इतकी असायला हवी. म्हणजे एका सेकंदात वीजवाहिन्यांच्या दोन तारांत ५० वेळा धन-ऋण भाराची अदलाबदल व्हायला हवी. ही गती मंदावली, म्हणजे 'फ्रिक्वेंसी' कमी झाली की वीज वहन बंद पडू शकते. स्पेनमध्ये नेमके हेच झाले. तशी वेळ आली कारण प्रत्यक्ष वापरापेक्षा वीज निर्मिती अधिक होत गेली. ही वीज निर्मिती कमी करता वा थांबवता आली नाही याचे कारण ही वीज सूर्यप्रकाशातून निर्माण केली जात होती. जोपर्यंत चांगला प्रकाश, ऊन आहे तोपर्यंत सौरपट्ट्या वीज तयार करतच राहणार, विजेची गरज असो वा नसो. अपारंपरिक ऊर्जा निर्मिती नियंत्रित करता येत नाही. ऊन नसेल तर सौर ऊर्जा तयार करता येत नाही आणि वारा पडलेला असेल तर पवन ऊर्जा निर्मिती होत नाही. सद्या:स्थितीत जलविद्या ुत ही एकमेव अशी ऊर्जा आहे की जी हवी तेव्हा निर्माण करता येते वा नको असेल तर निर्मिती थांबवता येते. कोळसा वा अणू ऊर्जानिर्मिती एकदा का सुरू झाली की ती थांबवण्यासाठी दीर्घ नियोजन करावे लागते. कोळसा जाळणाऱ्या भट्ट्या एकदम बंद करता येत नाहीत आणि अणू ऊर्जेची साखळी तोडता येत नाही. गेली काही वर्षे स्पेन आणि युरोपीय देशांत नियंत्रित करता येईल अशा ऊर्जा स्त्रोतांऐवजी अपारंपरिक ऊर्जा निर्मितीवर अधिक भर देणे सुरू आहे. त्यामुळे असे झाले, की नको असतानाही आणि मागणी नसतानाही सौर ऊर्जा राष्ट्रीय वीज जाळ्यात येत राहिली. मागणी नसतानाही पुरवठा होत राहिला की अन्य घटकांबाबत जे होते तेच विजेबाबतही झाले आणि 'फ्रिक्वेंसी' कमी होऊन संपूर्ण वीज जाळे (ग्रीड) वीजशून्य होत गेले. हे असे प्रथमच घडले वा असे काही होईल याची कल्पना नसताना हा प्रकार घडला, असे अजिबात नाही. सौर ऊर्जेबाबत हे असे होते, हे अभ्यासकांस माहीत होतेच. तथापि अशा वेळी पारंपरिक नियंत्रित ऊर्जा स्रोत या देशांनी अलीकडच्या काळात इतके कमी केले असतील याचा अंदाज मात्र संबंधितांस अजिबात नव्हता. म्हणजे असे, की ज्यावेळी सौर/ पवन आदी ऊर्जा वहनाची 'फ्रिक्वेंसी' घसरते त्यावेळी जल/ औष्णिक/ अणू ऊर्जा स्रोतांतून अधिक वीज निर्मिती करून घसरत्या फ्रिक्वेंसीला टेकू देत ती उंचावायची असते. जल/ औष्णिक/ अणू ऊर्जा स्रोत हे त्यांच्या ठाम स्थिरतेसाठी ओळखले जातात. त्यातून तयार होणाऱ्या विजेची 'फ्रिक्वेंसी' आणि 'निर्मिती' यांची निश्चित हमी देता येते. पण अपारंपरिक विजेचे खूळ डोक्यात गेलेले असल्याने नेहमीच्या पारंपरिक वीज निर्मितीकडे युरोपियांकडून दुर्लक्ष होत गेले. त्यामुळे झाले असे की मुबलक सौर ऊर्जेच्या 'फ्रिक्वेंसी'चा जेव्हा पाय घसरला तेव्हा तीस आधार द्यायला ना औष्णिक वीज हजर होती ना जलविद्या ुत. परिणामी सौर ऊर्जेची घसरती 'फ्रिक्वेंसी' हताशपणे पाहण्याखेरीज आणि खंडित वीजपुरवठा सहन करण्याखेरीज अन्य कोणताही पर्याय स्पेन, पोर्तुगाल यांच्या हाती राहिला नाही. अखेर फ्रान्सच्या अणुभट्ट्यांनी आधार दिला आणि कित्येक तासांनंतर वीजवाहक तारांच्या जिवात जीव आला. अपारंपरिक ऊर्जा स्रोतांवर इतके अवलंबून राहणे धोक्याचे. हा धडा शिकण्याची वेळ फक्त या दोन देशांवरच आली, असे नाही. जर्मनीची आताची वाताहत याचमुळे झाली. माजी चॅन्सेलर अँजेला मर्केल यांनी एका झटक्यात देशातील अणुभट्ट्या बंद करण्याचा निर्णय घेतला आणि जर्मनी ऊर्जा क्षेत्र आव्हानाच्या कचाट्यात सापडत गेला. आज युरोपात सर्वांत महाग ऊर्जा जर्मनीत आहे. परिणामी त्या देशाची अर्थव्यवस्था कोलमडली. एरवी अत्यंत धोरणी आणि अभ्यासू मर्केलबाईंचा या बाबतचा निर्णय मात्र चुकला. त्यांच्या चुकांतून आपण काही शिकणार का, हा प्रश्न! ऊर्जा ही बहुमुखी असावी लागते. सर्व ऊर्जा अंतिमत: एकच असली तरी तिची निर्मिती विविधतेतून झालेली असेल तरच ती स्थिर असते. सबब एकच एक ऊर्जा निर्मितीवर भर देण्याचा मूर्खपणा टाळायला हवा. नपेक्षा स्पेन, पोर्तुगाल यांच्याप्रमाणे 'कसा सूर्य अंधाराच्या वाहतो पखाली' असे म्हणण्याची वेळ आपल्यावरही येणार नाही; असे नाही.

# यशोगाथा रावळगाव चॉकलेटची

१९३० च्या दशकात एक गाडी थांबते, एका छोट्याशा गावात – रावळगाव. नाशिक जिल्ह्यातील या गावाचं नाव आजही लाखो लोकांच्या आठवणीत आहे, कारण इथूनच जन्माला आलं भारताचं सगळ्यात लोकप्रिय आणि नॉस्टॅल्जिक ब्रँड – 'पान पसंद', 'मँगो मूड' आणि इतर गोडीगोड टॉफ्या.

ही सुरुवात झाली होती उद्योजक सेठ वालचंद हीराचंद यांच्या एका ट्रेन प्रवासात. त्यांनी रावळगावचं कोरडं, बिघडलेलं जमीन पाहिलं आणि तिथेच भविष्य पाहिलं. त्यांनी तब्बल १५०० एकर जमीन विकत घेतली आणि १९३३ साली 'रावळगाव शुगर फार्म'ची स्थापना केली. साखर कारखान्याबरोबरच त्यांनी स्थानिकांना रोजगार दिला, शेतकऱ्यांना साथ दिली आणि गावात विकासाला चालना दिली.

१९४२ पासून गोड टॉफ्यांचा व्यवसाय सुरू झाला. अगदी साध्या, परंतु खास चव असलेल्या टॉफ्या – 'पान पसंद' ची सुगंधित चव, 'मँगो मूड'चा रसरशीत




आंबटगोडपणा आणि 'ऑरेंज' टॉफीची साधी पण सच्ची चव – या सर्वांनी भारतीय घराघरात जागा मिळवली. शाळेतील टिफिनमध्ये, परीक्षेनंतरच्या बक्षिसात, लग्नाच्या पंगतीत – या टॉफ्या सगळीकडे होत्या.

पण जसजसे काळ बदलत गेला, तसतसा रावळगावच्या या पारंपरिक ब्रँडला स्पर्धा वाढली. मोठ्या मल्टिनॅशनल कंपन्यांनी बाजार व्यापायला सुरुवात केली. उत्पादन खर्च वाढला, मार्केटिंगची गरज वाढली, आणि हळूहळू या ब्रँडची झळाळी कमी होऊ लागली.

तरीही 'पान पसंद' आणि 'मँगो मूड'सारख्या टॉफ्यांची जागा कोण घेऊ शकले नाही. याच nostalgic connect मुळे २०२४ मध्ये रिलायन्स कन्झ्युमर प्रॉडक्ट्स लिमिटेडने या ब्रँड्सना विकत घेतलं – तब्बल २७ कोटी रुपयांना. त्यांनी रावळगावच्या टॉफ्यांचे सर्व ट्रेडमार्क, रेसिपीज आणि बौद्धिक मालमत्ता आपल्या ताब्यात घेतली. मात्र मूळ कंपनीकडे जमीन, कारखाना आणि यंत्रसामग्री राहिली.

आज रावळगावच्या टॉफ्या नवीन हातात आहेत, पण त्यांच्या चवेमध्ये अजूनही जुन्या आठवणींची गोडी आहे. एक साधं गाव, एक दूरदृष्टी असलेला उद्योजक आणि एक गोड स्वप्न – याने घडवलेली ही कहाणी आजही लाखो भारतीयांच्या मनात 'पान पसंद' सारखीच खोलवर आहे.

तुमच्यासारख्या पिढीसाठी ही गोष्ट केवळ टॉफीची नाही – ती एका भारतीय ब्रँडच्या स्वदेशी प्रवासाची, चिकाटीची आणि नव्याने उभारी घेण्याची गोष्ट आहे.

# नांदगाव तालुक्यातील उपलब्ध जलसाठे,त्यातील क्षमता, व शेती सिंचनाच्या दृष्टीने आढावा बैठक संपन्न

सोमनाथ घोंगाणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------

नांदगाव तालुक्यात दोनशेच्या वर पाझर तलाव बंधारे लहान मोठे धरणे असून त्यातील गाळ काढून आहे त्या ठिकाणची साठवण क्षमता वाढविण्यासाठी तातडीने प्रस्ताव तयार करा व तालुक्याला टँकरमुक्त करण्याच्या दिशेने प्रयत्न करावे असे आवाहन आ. सुहास कांदे यांनी केले जेष्ठ नेते बापूसाहेब कवडे माजी आ. संजय पवार यांच्यासह तालुक्यातील पाणी प्रश्नी जाण असणाऱ्या पदाधिकारी व विविधशासकीय खातेप्रमुख यांच्या संयुक्त बैठकीत आ. कांदे बोलत होते पिण्याच्या पाण्याची समस्या मार्गी लागली असली तरी यंदा सगळी मेहनत केवळ शेतकऱ्यांच्या शेतात सिंचनाचे पाणी पोहचावे यासाठी आ. कांदे यांनी शब्द दिला होता तो पूर्ण करण्यासाठी कालबद्ध



नियोजनाचा भाग म्हणून आज आ.कांदे यांनी तालुक्यातील उपलब्ध जलसाठे त्यातील क्षमता याचा सांगोपांग आढावा घेतला जलसंधारण ची कामे वाढविण्यासोबत गाळ काढण्याचा कृती आराखडा निश्चित करावा त्यासाठी देवाज फाउंडेशनच्या माध्यमातून आर्थिक मदत देण्याचा इरादा त्यांनी बोलून दाखविला जेष्ठ नेते बापूसाहेब कवडे यांनी माणिकपुंज धरणामागील क्षेत्रात नव्या प्रकल्पाची आवश्यकता व्यक्त करताना यंत्रणेने अधिक सकारात्मक बघण्याची आवश्यकता व्यक्त केली समाधान पाटील यांनी पांझण मन्याड शाखांबरी लेंडी व अन्य लहान नद्यांचे संलग्नीकरण असलेला तालुका अंतर्गत नदीजोड प्रकल्प हाती घेण्याची मागणी केली. यावेळी तहसीलदार सुनील सौंदाने गटविकास अधिकारी पाठक साहेब, तालुका कृषी अधिकारी डंबाळे वनपरिक्षेत्र अधिकारी हेमंत कोकाटे, उपविभागीय जलसंधारण अधिकारी उपविभाग मालेगाव अंकिता वाघमारे, उपविभागीय जलसंधारण अधिकारी मृदू व जलसंधारण उपविभाग मालेगाव उप अभियंता माणिकपुंज प्रकल्प नागासागा प्रकल्प गिरणा धरण प्रकल्प सहाय्यक कार्यक्रम अधिकारी रोहयो नांदगाव. तसेच या प्रसंगी एकनाथ सदगीर, अमोल नावंदर ' सतीश बोरसे ' किशोर लहाने 'समाधान पाटील' प्रमोद भाबड' सागर हिरे 'प्रकाश शिंदे 'शरद सोनवणे' नितीन आहेर ' ॲड. अमोल आहेर, भैय्यासाहेब पगार आदी उपस्थित होते

# सलग दुसऱ्या दिवशी वादळी पावसासह गारपीट, कांदा, आंब्यांचे नुकसान

शैलेश रौंदळ
नशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------

जिल्ह्यातील अनेक भागात वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाने अनेक ठिकाणी वृक्ष उन्मळून पडले. घरांचे पत्रे उडाले. सुरगाणा तालुक्यात अंगणवाडी केंद्राचे नुकसान झाले. चांदवड तालुक्यात गारांसह जोरदार पाऊस झाला. मालेगाव तालुक्यात सायंकाळी १५ मिनिटे वावटळीमुळे नागरिकांची तारांबळ उडाली. पावसाने कांद्यासह आंब्यांचे नुकसान झाले. सोमवारी काही गावात पाऊस व गारपीट झाली होती. दुसऱ्या दिवशी सकाळपासून उन्हाचा कडाका जाणवत होता. दुपारनंतर ढगाळ वातावरण झाले. वाऱ्याचा वेग वाढला. वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाने सुरगाणा, येवला, त्र्यंबकेश्वर, येवला, निफाड,



कळवण आदी तालुक्यात नुकसान झाले. प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार सुरगाण्यातील चिंचले येथील मंगळू पाडवी, नरेश पाडवी यांच्या घरांचे पत्रे वादळी वाऱ्यात उडाले. याच भागातील मौजे वाघदौंड येथील अंगणवाडी केंद्राचे वादळी वाऱ्याने नुकसान झाले. पेठ, सुरगाणा भागात आंब्यांचे नुकसान झाले. येवला तालुक्यात वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. कळवण तालुक्यात सप्तश्रृंगी गडावर पावसाने हजेरी लावली. चांदवड तालुक्यात काही भागात जोरदार पाऊस झाला. निफाड, नांदगाव तालुक्यात मध्यम स्वरुपाचा पाऊस झाला. काही ठिकाणी जोरदार पावसासह गारपीट झाली. काढणीवर आलेल्या व शेतात काढून ठेवलेल्या कांद्याला हा पाऊस नुकसानकारक ठरला.

## वादळामुळे वीज पुरवठा खंडित

मालेगाव तालुक्यात वावटळीमुळे अनेक ठिकाणचे वृक्ष उन्मळून पडले. धुळीच्या वादळाचा एवढा जोर होता की,घराबाहेर असलेले नागरिक तसेच रस्त्यावरील वाहनचालकांची त्यामुळे दाणादाण उडाली. बराच वेळ हे वादळ सुरू असल्याने लोकांना भीतीपोटी सुरक्षित जागेचा आसरा घ्यावा लागला. सध्या लग्नसराईचा हंगाम आहे. त्यानुसार शहरात अनेक ठिकाणी मांडव तसेच लग्न समारंभांचे आयोजन केले होते. अचानक आलेल्या वावटळीमुळे काही ठिकाणी मंडप उडाले. वादळामुळे शहरातील विद्युत पुरवठा देखील खंडित झाला. याच सुमारास म्हाळदे शिवारातील कचरा डेपोला लागलेल्या आगीची व्याप्ती वादळामुळे आणखी वाढत गेली. काही वेळानंतर अग्निशमन दलाने आगीवर नियंत्रण मिळवले

# देगलूर महाविद्यालयाच्या वतिने गुणवंत विद्यार्थीनींचा सत्कार

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

----------------------------

देगलूर येथील अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयाने शैक्षणीक सत्र २०२४-२५मधे झालेल्या इ.बारावी वर्ग बोर्डाचा निकाल जाहीर झाला असून यंदा ही देगलूर महाविद्यालयाने यशाची परंपरा कायम राखली असून निकालामधे मुलीनी बाजी मारली आहे .म.रा.मा.उ.मा.शिक्षण मंडळ लातूर च्या वतिने [फेब्रु.-मार्च २४|२५] घेण्यात आलेल्या परीक्षेत महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील कु.मोखेडे स्फूर्ती हिने ९३% गुण घेऊन महाविद्यालयात प्रथम आली आहे तसेच कला शाखेतील बरगे वैष्णवी, साक्षी सोनकांबळे या गुणवंताचा यानिमित्त



सत्कार अ.व्या. शिक्षण संस्थेच्या व महाविद्यालयाच्या वतिने संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर , सचिव डॉ.कर्मवीर उनग्रतवार नारायणराव मैलागीरे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी उपाध्यक्ष जनार्धन चिद्रावार सहसचिव राजकुमार महाजन, कोषाध्यक्ष विलास तोटावार, कार्यकारिणी सदस्य देवेंद्र मोतेवार, सूर्यकांतशेठ नारलावार, नारायणराव मैलागीरे, गंगाधरराव जोशी, रविंद्र अप्पा द्याडे, चंद्रकांत नारलावार, गुरुराज चिद्रावार, विजय उनग्रतवार प्राचार्य डॉ.मोहन खताळ,उपप्राचार्य डॉ.अनिल चिद्रावार,अधिक्षक गोविंद जोशी,उपप्राचार्य प्रा.डा ॅ.एम. एम. चमकुडे, उपप्राचार्य प्रा.डा ॅ.शेरीकर व्ही.जी.पर्यवेक्षक प्रा.एस.एन.पाटील आदीनी अभिनंदन केले यावेळी प्रा.दत्ता पाटील प्रा.महेश कुलकर्णी,प्रा सचिन कोंडेकर, प्रा.लागले तुकाराम, प्रा.रत्नाकर चिद्रावार, प्रा.सत्यजित सावळे.प्रा.नरेंद्र मुक्तावार आदि शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

PASSWORD PROTECTED PAGE

PASSWORD PROTECTED PAGE